**ठळक बातम्या**

- अनंत चतुर्दशीच्या दिवशी लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप/ राज्यात अनेक ठिकाणी आज दुपारपर्यंत विसर्जन मिरवणुका

- गणेशविसर्जन मिरवणुकीतल्या दुर्घटनांमधे राज्यात ११ जणांचा मृत्यू

- बहुपक्षीय जागतिक व्यापारपद्धतीप्रति भारत वचनबद्ध असल्याचं केंद्र सरकारचं शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीत प्रतिपादन

- जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाला कंपाऊंड प्रकारात सुवर्ण पदक

**आणि**

- आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत चीनचा पराभव करुन भारतीय संघ अंतिम फेरीत दाखल, अंतिम लढत कोरियाशी

**<><><><>**

१० दिवस चाललेल्या गणेशोत्सवाची अनंतचतुर्दशीच्या दिवशी सांगता झाली. पुढच्या वर्षी लौकर या असं आश्वासक आवाहन करीत वाजत गाजत गणरायाला निरोप देण्यात आला. अनेक ठिकाणी काल सुरू झालेली विसर्जन मिरवणूक अद्याप सुरू आहे. मुंबईतल्या विसर्जन मिरवणुकीबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ...

***होल्ड... व्हीसी***

*(मुंबईच्या गणेशविसर्जन सोहळ्याचं आकर्षण असलेल्या लालबागच्या राजाचं विसर्जन तराफ्यातल्या बिघाडामुळे बराच वेळ खोळंबलं होतं, ते काही वेळापूर्वी गिरगाव चौपाटीवर झालं. तसंच उमरखाडीचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी यासह सुमारे २० सार्वजनिक गणेशमंडळांच्या मानाच्या बाप्पाचं विसर्जनही शांततेत होत आहे. भर पावसातही लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक गणरायांचं दर्शन घेण्यासाठी रस्त्यावर गर्दी केली आहे. त्यांच्या सोयीसाठी विविध स्वयंसेवी संस्था आणि राजकीय पक्षांनी ठिकठिकाणी स्टॉल्स उभारले आहेत. विसर्जन मिरवणूक सुरळीत पार पाडण्यासाठी गिरगाव चौपाटीवर ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. मिरवणुकीत मुंबईत नैसर्गिक*

*आणि कृत्रिम विसर्जन स्थळांवर आत्तापर्यंत सुमारे २ हजार ७०० सार्वजनिक मूर्ती, २६ हजारापेक्षा घरगुती मूर्ती, तर ३०७ गौरींचं विसर्जन झाल्याची माहिती पालिकेच्या सूत्रांनी दिली. गणेशविसर्जनानंतर आज सकाळी जुहू चौपाटीवर स्वच्छता मोहिमेचं आयोजन करण्यात आलं होतं. मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम, बॉलीवुड अभिनेता अक्षय कुमार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस सहभागी झाल्या होत्या.)*

**<><><><>**

राज्यात इतरत्रही भक्तीभावानं गणरायाला निरोप दिला गेला. ठिकठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदंगांच्या तालावर गणरायाला निरोप देण्यासाठी निघालेल्या भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत असल्याचं चित्र दिसत होतं.

**पुण्यात** मानाच्या पाचही गणपतींचं विसर्जन झालं, मात्र काही ठिकाणी आज दुपारपर्यंत विसर्जन मिरवणुका सुरु होत्या.

**जळगाव** शहरासह संपूर्ण जिल्ह्यातही ढोल तश्याच्या गजरात लाडक्या गणरायाला निरोप दिला गेला. अमळनेर इथं आज पहाटे ५ वाजेपर्यंत, तर शहरात रात्री १ वाजेपर्यंत मुख्य मिरवणूका सुरू होत्या. या मिरवणूक पाहण्यासाठी आलेल्या गणेशभक्तांमुळे सर्व रस्ते गर्दीने फुलून गेले होते.

**नाशिक** शहरातही १५ तासांच्या उत्साही मिरवणुकीनंतर गणरायाला निरोप दिला गेला. गणेश विसर्जनासाठी गोदावरी नदीवरील रामकुंड इथं विशेष नियोजन केलं गेलं होतं.

**छत्रपती संभाजीनगर** शहरात यंदा साडेअठराशेपेक्षा जास्त सार्वजनिक तर २५ हजारांपेक्षा जास्त  घरगुती गणेशमूर्तीचं विसर्जन केलं गेलं.  मोठ्या संख्येनं कृत्रिम तलावांमध्ये मूर्ती विसर्जित केल्या गेल्या.

**लातूर**मध्ये गंजगोलाई परिसरात विविध देखाव्यांनी सजलेल्या गणेश विसर्जन मिरवणुकींतून पर्यावरण संवर्धन, राष्ट्रीय एकता, संस्कृतीविषयक संदेश दिले गेले.

**कोल्हापूरात** डॉल्बी तसंच पारंपारिक वाद्यासंह भक्तिमय वातावरणात सार्वजनिक मंडळांच्या गणेश मूर्तींचं विसर्जन झालं. सकाळी नऊ नंतर मानाचा तुकाराम माळी तालिम मंडळाच्या गणेशाचं पूजन करून मिरवणुकीला प्रारंभ झाला. शहरात महापालिकेच्यावतीनं

मूर्ती दान करायची व्यवस्था केली होती, तर ठिक ठिकाणी विसर्जन कुंडांची व्यवस्थाही केली गेली होती.

**<><><><>**

राज्यात सर्वत्र गणेश विसर्जनाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना काही ठिकाणी दुर्घटनांमुळे उत्सवाला गालबोट लागलं. विसर्जनादरम्यान, राज्यात विविध ठिकाणी मिळून ११ जणांचा मृत्यू झाल्याचं समजतं. मुंबईत साकीनाका परिसरात एका विसर्जन मिरवणुकीत हाय टेन्शन वायरमधून शॉक लागल्यानं एकाचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे, तर या दुर्घटनेत ५ जण जखमी झाले असून त्यांना नजिकच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. टाटा पॉवर कंपनीची ११ हजार व्होल्टेजची वायर मिरवणुकीच्या ट्रॉलीला लागून ही दुर्घटना घडली.

**पालघर जिल्ह्यात** विरारच्या मारंबळपाडा इथं गणेश विसर्जनादरम्यान खाडीत बुडणाऱ्या तीन भाविकांना स्थानिक मच्छीमार आणि रो-रो सेवेच्या कर्मचाऱ्यांनी वाचवलं.

**ठाणे जिल्ह्यात**ल्या शहापूरमध्ये विसर्जनादरम्यान तीन तरुण पाण्यात वाहून गेले.

**पुणे जिल्ह्यात** चाकण परिसरात वेगवेगळ्या घटनांमध्ये गणेश विसर्जनासाठी गेलेले चार जण पाण्यात बुडून मृत्युमुखी पडले. वाकी खुर्द इथल्या भीमा नदीत दोन जण, बिरदवडी इथल्या विहिरीत एक जण, तर शेलपिंपळगाव इथंही भीमा नदीत एक जण अशा वेगवेगळ्या घटनांमध्ये चार जण बुडाल्याचं वृत्त आहे.

**नांदेड**मध्येही गणेश विसर्जनासाठी गेलेले २ युवक नदीत बुडाले.

**अमरावती जिल्ह्यात** धामणगाव रेल्वे तालुक्यात वाघोली गावात विसर्जनाच्यावेळी एका २२ वर्षीय युवकाचा पाय घसरून तो नदीत वाहून गेला.

**नाशिक जिल्ह्यात** गणेश विसर्जनादरम्यान गंगापूर रोडवरच्या आनंदवली परिसरात एक २४ वर्षीय तरुण नदीच्या पाण्यात बुडून वाहून गेला.

**<><><><>**

जागतिक व्यापार संघटनेबरोबर खुल्या, निःपक्ष आणि समावेशक पद्धतीच्या बहुपक्षीय व्यापार प्रणालीसाठीची वचनबद्धता भारताने पुन्हा एकदा स्पष्ट केल्याची माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने निवेदनात दिली आहे. शांघाय सहकार्य संघटनेच्या काल झालेल्या बैठकीत भारताने सामायिक समृद्धीसाठी सामूहिक प्रयत्न करण्यावरही भर दिला.

निर्यातीमधलं अवलंबित्व कमी करणं, पुरवठा साखळीतली लवचिकता वाढवणं या बाबी आवश्यक असल्याचंही भारताने या बैठकीत अधोरेखित केलं. व्यापार प्रवाह वाढवण्यासाठी समावेशक धोरण अवलंबणं महत्त्वाचं असल्याचंही भारताने स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने या कराच्या रचनेत नुकतेच क्रांतिकारी बदल केले. यातल्या काही बाबींविषयी सविस्तर माहिती आमच्या प्रतिनिधीकडून….

**- - व्हॉईस कास्ट…अंकिता - -**

(पुढच्या पिढीचं भविष्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीनं लहान मुलांच्या वापरातल्या विविध वस्तूंवरच्या करात कपात करण्यात आली आहे. त्यात बालकांना दूध पाजण्याच्या बाटल्या, निपल्स, डायपर्स, लहान मुलांची खेळणी, विशेषतः देशातल्या हस्तकला कारागीरांनी बनवलेल्या बाहुल्या, इत्यादींवर १२ टक्के ऐवजी ५ टक्के कर राहणार आहे.

पेन्सिल शार्पनर आणि खोडरबर यांच्यावरचा कर शून्य टक्के झालाय तर शालेय वह्या पुस्तकं, प्रयोगवह्या, ग्राफ वह्या, नकाशे, अध्यापनोयोगी उपकरणं यांच्यावरही शून्य टक्के कर राहील.  कंपासपेट्या आणि रंगपेट्या, मुलांच्या तीनचाकी सायकली, हँडमेड कागद, दप्तरं, पाऊचेस, पत्त्यांचे कॅट, कॅरमबोर्ड आणि इतर बैठ्या आणि मैदानी खेळांचं साहित्य यावरचा कर १२ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे. ऐकूया याबाबत एका मातेची प्रातिनिधिक प्रतिक्रीया….

**- - होल्ड- बाईट- रक्षिता - -**

*बाळांसाठीच्या दुधाच्या बाटल्या, निपल्स, डायपर हे साहित्य स्वस्त झालं तर बराच खर्च वाचेल. सुका मेवा आणि माल्ट सारखे पौष्टिक पदार्थ स्वस्त झाले तर मुलांना अधिक पौष्टिक आहार कमी खर्चात देता येईल. या वस्तू कमी किमतीला मिळतील अशी आशा वाटते.)*

*(मात्र उंची दर्जाचे विशेष वापरासाठीचे कागद, पॅकिंगसाठी वापरले जाणारे कोरोगेटेड पुठ्ठे या सामुग्रीवरचा कर १२ ऐवजी १८ टक्के करण्यात आला आहे. नवीन कररचना येत्या २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.)*

**<><><><>**

जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाने कंपाऊंड प्रकारात सुवर्ण पदक पटकावलं आहे. ऋषभ, प्रथमेश आणि अमन या तीन भारतीय तीरंदाजांनी सर्वाधिक २५३ गुण मिळवले. फ्रान्सच्या संघाला २३३ गुण मिळवल्यामुळे रौप्य पदक मिळालं.

**<><><>**

बिहार इथे सुरू असलेल्या आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या सुपर फोर फेरीत भारतीय संघाने चीनचा ७-०ने धुव्वा उडवत अंतिम फेरी गाठली आहे. आता अंतिम सामन्यात भारताचा सामना कोरियाशी होणार आहे. सुपर फोर फेरीत मिळवलेल्या विजयामुळे सात गुणांसह भारत गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. या स्पर्धेतल्या विजेत्या संघाला पुढच्या वर्षी होणाऱ्या हॉकी विश्वचषकासाठी पात्रता मिळवण्याची संधी मिळेल.

**<><><>**

इटलीमधे व्हेनीस इथं आयोजित ८२व्या व्हेनीस आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात भारतीय चित्रपट निर्माती अनुपर्णा रॉय यांना ‘साँग्ज ऑफ फरगॉटन ट्रीज’या पहिल्याच चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून पुरस्कार मिळाला आहे. महोत्सवाच्या ओरीजॉन या विभागात नवोन्मेषासाठी त्यांना हा पुरस्कार प्राप्त झाला असून तो मिळवणाऱ्या रॉय या पहिल्या भारतीय ठरल्या आहेत.

**<><><>**

नक्षलवाद्यांचा म्होरक्या अमित हांसदा ऊर्फ अपटन हा पोलिसांच्या गोळीबारात ठार झाला आहे. नक्षलवादी संघटनेचा विभागीय कमांडर असलेल्या अमितवर दहा लाख रुपयांचं बक्षीस होतं. झारखंडच्या पश्चिम सिंहभूम जिल्ह्याच्या चायबासा गावानजिक आराहासा भागातील बुरजूवा डोंगर परिसरात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक उडाली त्यात तो ठार झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. पोलिसांना प्राप्त माहितीनंतरच्या शोधमोहिमेदरम्यान ही कारवाई झाली. सध्या या संपूर्ण डोंगराळ परिसराला सुरक्षादलांनी वेढा घातला असून नक्षलवाद्यांना पळून जाण्याचे मार्ग बंद करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**//<><><><>//**